# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/2010/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १५ ◆ अंक ६ ◆ अमरावती ◆ दि. ३० मे ते ५ जून २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


# डॉ. आंबेडकरांचा फोटो असलेले पोस्टर फाडल्याप्रकरणी शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड यांचेवर गुन्हे दाखल

## भाजप, रिपाइंचं आंदोलन करणार

मुंबई : शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांना महाडमध्ये जाऊन मनुस्मृतीचं दहन करणं चांगलंच महागात पडलं आहे. हे आंदोलन करत असताना आव्हाड यांच्या हातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेलं पोस्टर फाडलं गेलं. या प्रकरणी आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्लोक घेण्यात येणार असल्याच्या निषेधार्थ शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी महाड येथे मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम घेतला. मनुस्मृती दहन करत असतानाच आव्हाड यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेलं पोस्टर फाडलं गेलं. हा प्रकार अनावधानाने झाल्याचं आव्हाड यांनी सांगितल्यानंतरही भाजपने हा मुद्दा लावून धरला आहे. भाजपने आव्हाड यांच्या विरोधात उद्या राज्यभर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. तर रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपाइंही उद्या आंदोलन करून आव्हाड यांचा निषेध नोंदवणार आहे. तसेच आव्हाड यांच्या विरोधात या





प्रकरणी दोन गुन्हे दाखल झाल्याने त्यांची चांगलीच अडचण झाली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं पोस्टर फाडल्या प्रकरणी जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात पुण्यात पहिला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुण्यातील बंड गार्डन पोलीस स्टेशनमध्ये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे शहर भाजपकडून ही तक्रार करण्यात आली होती. तर आव्हाड यांच्या विरोधात रायगडमध्ये दुसरा स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी महाड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रायगडमध्य जिल्हाधिकाऱ्यांनी जमावबंदीचे आदेश दिले होते. या आदेशाचं आव्हाड यांनी उल्लंघन केलं आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात भा. दं. वि. कलम १८८ आणि मुंबई पोलीस कायद्यानुसार जितेंद्र आव्हाड आणि २२ कार्यकर्त्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे पोलीस फिर्यादी झाले आहेत.दरम्यान, आव्हाड यांनी बाबासाहेबांचा फोटो फाडल्याने भाजप आक्रमक झाली आहे. भाजपने उद्या राज्यभर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्या कांदिवली, सीएसटी, दादरसह राज्यातील विविध भागात भाजपचे कार्यकर्ते आंदोलन करणार आहेत. सकाळी साडे नऊ वाजता या आंदोलनाला सुरुवात होणार आहे.

### आव्हाडांनी मागितली माफी

दरम्यान, अनावधानाने माझ्याकडून माझ्या बाबाचा फोटो नकळत फाडला गेला, ही अत्यंत गंभीर चूक असल्याचे सांगत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तमाम नागरिकांची नतमस्तक होऊन माफी मागितली आहे. तसेच आंबेडकरी अनुयायीही मला माफ करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# ‘भूमिपुत्राचे स्वातंत्र्य’ काव्यसंग्रहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

अमरावती: जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा २०२४ च्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त कवी पद्माकर मांडवधरे यांना ’भूमिपुत्राचे स्वातंत्र्य’ या काव्यसंग्रहासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



नागपूर येथील विदर्भ हिंदी साहित्य भवनाच्या मधुरम सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात हिन्दी साहित्य सम्मेलन आला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, मुख्य आयोजक प्रा. डॉ. दीपककुमार खोब्रागडे, प्रा. मिलिंद रामटेके, प्रा. डॉ. वैशाली प्रधान, प्रा. डॉ. विद्याधर बनसोड आदींची उपस्थिती होती. कवी पद्माकर मांडवधरे यांच्या याच काव्य संग्रहाला या आधी स्व. मातोश्री सूर्यकांतादेवी रामचंद्र पोटे उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीबद्दल गौरविण्यात आले आहे

# कुटुंबातील ८ जणांची हत्या करून घेतला मनोरुग्णाने गळफास

छिंदवाडा : एका मनोरुग्णाने आपल्याच संयुक्त कुटुंबातील ८ जणांची कुऱ्हाडीने घाव घालून हत्या करून स्वतःही आत्महत्या केल्याचा खळबळजनक प्रकार मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात बुधवारी भल्या पहाटे घडला.





या सामूहिक हत्याकांडाविषयी सविस्तर वृत्त असे की, मध्य प्रदेशच्या छिंदवाडा स्थित बोदल कछार गावातील २६ वर्षीय रहिवाशी दिनेश सरियाम या मनोरुग्णाने निर्दयीपणे स्वतःची पत्नी, आई, बहीण, भाऊ, भावजयी आणि घरातील तीन अल्पवयीन बालकांना जीवे मारले आहे. बुधवारी भल्या पहाटे अडीच वाजेच्या सुमारास ही हृदयद्रावक घटना घडली. घरातील ८ जणांना यमसदनी पाठवल्यानंतर दिनेश थांबला नाही. त्याने स्वतःच्या दुसऱ्या भाच्यावर जीवघेणा हल्ला केला; परंतु तो यातून बालंबाल वाचला व त्याने घरातून पळ काढला, अशी माहिती छिंदवाडाचे पोलीस अधीक्षक (एसपी) मनीष खत्री यांनी दिली. दिनेश सरियाम याचा २१ मे रोजी विवाह झाला होता. लग्नाला अवघा आठवडाच पूर्ण झाला असतानाच त्याने स्वतःच्या पत्नीलाही ठार मारले आहे. सकाळ होताच हे हत्याकांड गावकऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी ताबडतोब पोलिसांना कळवले. पोलिसांनी घराची झडती घेतली असता हल्लेखोर सरियाम घरातील एका खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.






# कारची समोरासमोर धडक; एक ठार

## कारचालकासह दोघे जखमी, वाघामाय माता मंदिराजवळ अपघात

अमरावती : कारची समोरासमोर धडकहोऊन एकाचा मृत्यू झाला. तर दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवार, २९ मे रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास अमरावती-चांदूर रेल्वे मार्गावरील वाघामाय माता मंदिराजवळील घाटात घडला.योगेश हरिभाऊ गावंडे (३२), रा. मरोळा, अकोला असे मृतकाचे नाव आहे. या अपघातात अक्षय विठ्ठलराव गावंडे (२७) व शुभम गणेशराव गावंडे (२४) दोघेही रा. मरोळा, अकोला हे जखमी झाले. अक्षय गावंडे हे





योगेश, शुभम, चेतन अजय गावंडे (२९) व महेश गजानन गावंडे (२४) यांच्यासोबत बुधवारी सकाळी आपल्या कार क्रमांक एमएच ३७ व्ही ११७६ ने मरोळा येथून यवतमाळ येथे बी-बियाणे खरेदी करण्याकरिता अमरावती ते चांदूर रेल्वे मार्गाने जात होते. ते वाघामाय माता मंदिराजवळील घाटात असताना चांदूर रेल्वेकडून आलेल्या कार क्रमांक एमएच १४ केजे १४८४ ने त्यांच्या कारला रॉंग साईडने जोरदार धडक दिली. या अपघातात योगेश गावंडे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.




काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।


कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## महिलांची सुरक्षिततेचे असावे भान

*महिलांची सुरक्षितता ही केवळ सुरक्षा यंत्रणांची किंवा सरकारांचीच जबाबदारी नसून महिलांच्या सुरक्षिततेचे सर्वाधिक भान समाजामध्येच रुजण्याची गरज आहे, हे वेळोवेळी स्पष्ट झाले असूनही, जेव्हा हा मुद्दा चर्चेला येतो तेव्हा सामूहिकपणे सरकारे किंवा सुरक्षा यंत्रणांच्या खांद्यावर जबाबदारीचे ओझे ढकलून समाजात त्रयस्थपणे या मुद्द्याची चर्चा होत राहते. हे चित्र जोवर बदलत नाही, तोवर महिलांच्या सबलीकरण किंवा धोरणांची भेंडोळी हाताळताना मनाच्या एखाद्या कोपऱ्यात अपराधीपणाची भावना नक्कीच डोके वर काढत असेल यात शंका नाही. महिलांची सुरक्षितता आणि अनैतिक व्यवहार यांचा फार जवळचा संबंध असून जेव्हा गुन्हेगारीविषयीची चर्चा सुरू होते, तेव्हा महिलांच्या लैंगिक शोषणापासून अनैतिक व्यापारापर्यंतचे सर्वच मुद्दे समाजास आव्हान देऊ लागतात. लहान मुलांची चोरी करून बेकायदा धंद्यांकरिता होणारी त्यांची विक्री आणि मानवी विकृती आदी अनेक बाबींची शिकार होणाऱ्या बालिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न समाजासमोर येत नाही, असा दिवस आजकाल शोधावाच लागणार आहे. माध्यमांच्या रकान्यांच्या गर्दीत अशा बातम्या कोठल्याही एखाद्या कोपऱ्यात दडल्या, तरी संवेदनशील मनांना त्या अस्वस्थ करतात. हैदराबाद पोलिसांनी केलेल्या एका ताज्या कारवाईतून अशीच एक अस्वस्थ करणारी बातमी उजेडात आल्याने, समाजाचे सजगतेचे भान आणि मुलींच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. गेल्या मंगळवारी दोन दिवसांपूर्वी, पोलिसांनी केलेल्या एका कारवाईत मुलांची तस्करी करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीला अटक करण्यात आली. अशा बातम्या गेल्या काही वर्षांपासून अधूनमधून नेहमीच येत असतात. या कारवाईतून उजेडात आलेला तपशील म्हणजे आधीच्या तशाच कारवायांच्या तपशिलाचीच पुनरावृत्ती असल्याने हे अमानवी व्यापारचक्र कधी थांबणार नाहीच का, या प्रश्नाचा विळखा समाजाभोवती आवळला गेला आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणातील विविध भागांत केल्या गेलेल्या कारवाईनंतर अटक करण्यात आलेल्या या टोळीकडून ताब्यात घेतल्या गेलेल्या १६ बालकांपैकी, चार मुले आणि १२ मुली आहेत. ज्या बालकांना अद्याप उघड्या डोळ्यांनी जग जाणून घेण्याचे भानदेखील आलेले नाही, अशा केवळ २३ दिवसांपासून तीन वर्षे वयापर्यंतची ही बालके पोलिसांच्या कारवाईमुळे मुक्त झाली नसती, तर त्यांच्या भालावरील भविष्यरेषा कुठेही भरकटली असती यात शंका नाही. ही टोळी महाराष्ट्रातही कार्यरत असल्याचे काही धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याने, महाराष्ट्रातील महिला व बालिकांच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यांवरील प्रश्नचिन्ह पुन्हा गडद झाले आहे. या टोळीला मुलांची विक्री करणारी यंत्रणा पुण्याच्या परिसरात कार्यरत असून निपुत्रिक जोडप्यांना मुले विकण्याचा धंदा या टोळीमार्फत चालत असल्याचा पोलिसांचा संशय आहे. या टोळीने आतापर्यंत ५० हून अधिक बालकांची तस्करी केली असून सहा लाख रुपयांपर्यंत त्यांची विक्री केली जात असल्याची बाबही तपासातून उघड झाली आहे.देहविक्रयासारख्या अनैतिक धंद्यांकरिता मुलींची तस्करी करण्याचे प्रमाण भयावह असल्याचे राष्ट्रीय गुन्हे तपास यंत्रणेच्या वेळोवेळीच्या अहवालांतून उघडकीस येत असते. २०१८ ते २०२२ या चार वर्षांत देशातून ४७ हजारांहून अधिक बालके बेपत्ता झाल्याची या संस्थेच्या अहवालाची नोंद असून त्यापैकी सत्तर टक्क्यांहून अधिक मुली आहेत, ही बाब लाजीरवाणी म्हणावयास हवी. तस्करीचे हे प्रमाण वर्षागणिक वाढतच असताना, मुलीच्या जन्माभोवतीचा नाकारलेपणाचा डागही अधिकाधिक ठळक होताना दिसतो. देशात मुलींना टाकून देण्याचे प्रमाणही वाढत असल्याची बाब दोन महिन्यांपूर्वी एका स्वयंसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. मुलींना नाकारण्याचे प्रमाण वाढत असल्यामुळेच दत्तक दिल्या जाणाऱ्या बालकांमध्येही मुलींचे प्रमाण अधिक असल्याचे या संस्थेचे म्हणणे होते. सन २०२१ ते २०२३ या काळात देशातील ११ राज्यांमधील १८ वर्षांखालील १५ हजार ५३६ मुलांना दत्तक विधानाद्वारे पालक मिळाले, अशी माहिती दत्तक विधानासंबंधीचे नियमन करणाऱ्या सेंट्रल अडॉप्शन रिसोर्स ॲथॉरिटा (कारा) या संस्थेने न्यायालयासमोर दिली होती. यापैकी नऊ हजार ४७५ मुली होत्या, असेही या माहितीतून उघड झाले होते.*

# ग्रामीण शेतीतून कौटुंबिक एकीचा संदेश देणारी कलाकृती ह्न 'आम्ही रानातली फुले'

आधुनिक तंत्रज्ञानाने विकसित झालेल्या देशांत जवळपास ६० टक्के महिला शेती उत्पनात अग्रेसर राहिलेल्या आहेत. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी स्त्री पुरुष समुदायिक पद्धतीने शेती करतांना दिसून येतात. शेतीसोबतच शेतीपूरक व्यवसायातही पशुधनाची देखील काळजी घेऊन शेतीचे आर्थिक व्यवस्थापन करणे या सर्व कामात महिलांचा सक्रीय सहभाग असतो. शेतीमध्ये महिला पेरणी, लागवड, निंदणी, खुरपणी, सोंगणी, कापणी, खुडणी, वेचणी यांसारखी कुशल– अकुशल व कष्टाची कामे करतात. या महिलांना मजुरी देखील पुरुषांपेक्षा कमी मिळते आणि त्यात नियमित काम देखील मिळत नाही. कोरडवाहू शेतीत केवळ ५०–६० दिवस तर बागायती क्षेत्रात हेच काम ९० ते १०० दिवस काम मिळते. काही ठिकाणी पती पत्नी दोघेही सोबतच शेतात राबत असतात.




शेतीच्या बिकट परिस्थितीचे दर्शन करणारी एक कलाकृती नुकतीच पाहण्यात आली, या कलाकृतीचे मुखपृष्ठ पाहून वरील परिस्थितीचे वस्तुनिष्ठ दर्शन झाले. असे हे चित्र दाखवणारी विद्या सरपाते यांची काव्यकलाकृती म्हणजे आम्ही रानातली फुले या मुखपृष्ठावरील काही संदर्भ माणसाला विचार करायला लावणारे दिसून आले. यावर एक पुरुष आणि एक महिला शेतीची कामे करतांना दाखवले आहेत. एकाच्या हातात आसूड दाखवला आहे तर स्त्रीच्या हातात शेतीत बी पेरणीचे मोघड(एका नळीचे चाडे) पेरणी करतांना दाखवले आहे, पाठीमागे सुंदर असे फुल बहरलेले दिसत आहे तर उंच चबुतऱ्यावर काही माणसांच्या प्रतिमा शेतीकाम करणाऱ्या जोडीकडे बघत असल्याचे दिसत आहे

आम्ही रानातली फुले या कलाकृतीकडे पाहत असतांना या भागातील भौगोलिक, आर्थिक, सामाजिक परिस्थितीचे दर्शन होते, आर्थिक उलाढाल कमी असल्याने बरेच कुटुंब रोजंदारी करणारे दिसून येतात, सर्वत्र सारखीच परिस्थिती असल्याने मजूर कमी आणि काम जास्त अशी परिस्थिती असल्याने मजूर येत नाहीत, कामाच्या प्रमाणात उत्पन्न नसल्याने जास्त मजुरी देणे परवडत नाही म्हणून रोजंदारीचा दर कमी मिळतो त्यात महिला कमी दरात कामाला उपलब्ध होतात. मात्र पती पत्नी दोघेही जर शेतात राबले तर शेतीत बाहेरून मजूर घ्यावे लागत नाही परिणामी मजुरीचा खर्च वाचतो आणि पतीपत्नीची एकमेकाला साथ लाभते हा संदेश देणारे चित्र या मुखपृष्ठावर रेखाटले आहे आणि याचे प्रतिक म्हणून या कलाकृतीच्या मुखपृष्ठावर पती सोबत पत्नी शेती करतांना दाखवली आहे हा अर्थ मला यातून भावला.

आम्ही रानातली फुले या कलाकृतीचे बारकाईने निरीक्षण केले असता काही सामाजिक संदर्भ यातून दिले आहेत. सन १८८३ साली क्रांतीसूर्य, शेतकऱ्यांचे कैवारी जोतिबा फुले यांनी शेतकऱ्याचा आसूड हा महान ग्रंथ लिहून भारतीय कुणबी, शेतकरी, कष्टकरी समुदायाला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. हातात लेखानीचा आसूड घेऊन समाजातील प्रस्थापित व्यवस्थेला आपल्या लेखनीतून फटके मारून समाज जनजागृती केली. हा तळागाळातील समाज एकवटला आणि अन्यायाविरुद्ध दंड थोपटून क्रांतिसूर्य ज्योतीबांच्या मागे खंबीर उभा राहिला. हातात आसूड घेतल्याशिवाय ही व्यवस्था बदलणार नाही.. हे क्रांतीचे प्रतिक आहे, समाजव्यवस्थेवर आसूड ओढण्याचे हेच संदर्भ घेत कवयित्री विद्या सरपाते यांनी एका प्रातिनिधिक शेतकरी पुरुषाच्या हातात आसूड देवून हेच तर दाखवले नसेल ? आता शेती वाचवली पाहिजे, शेतकरी वाचवला पाहिजे.. शेतीमालाला हमी भाव नाही, शेतकरी आत्महत्या करत आहे, शेतकरी दिवसेंदिवस पिचला जात आहे, शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे या अन्यायाविरुद्ध आता आसूड घेतला पाहिजे. हा शेतकऱ्याचा आसूड आहे हे तर सूचित करायचे नाही ना ? असा अर्थ मला येथे अभिप्रेत होत आहे.

आम्ही रानातली फुले या मुखपृष्ठावर एका महिलेच्या हातात शेतीत बी पेरणीचे मोघड(एका नळीचे चाडे) पेरणी करतांना दाखवले आहे.. या कृतीकडे बघतांना स्त्रीविषयक प्रगत भावना व्यक्त होतांना दिसत आहे. एका नळीच्या मोघडाने पेरणी करणे म्हणजे स्त्री आता एकटी शेतीकाम करण्यास सक्षम आहे. ती आता प्रगल्भ आणि प्रगत झाली आहे. सोबत जर आसूड घेऊन जोडीदार असेल तर एकीला बळ मिळते आणि दोघं मिळून हे काम सहज पेलवू शकतात हा कौटुंबिक एकीचा संदेश यातून दिला गेला असावा असे मला वाटते. दोघांनी जर कष्ट केले तर या कष्टाचे फळ म्हणून त्यांनी फुलवलेली शेती पाठीमागे हिरवीगार झाली आहे. म्हणजेच त्यांचा परिवार सुखी होऊ शकतो त्याचेच प्रतिक म्हणून पाठीमागे सुंदर असे फुल बहरलेले दिसत आहे असा अर्थ मला यातून जाणवला आहे.

आम्ही रानातली फुले या कलाकृतीच्या परिस पब्लिकेशन पुणे, यांनी प्रकाशित केलेल्या मुखपृष्ठचित्रकार नंदू वानखेडे यांनी अतिशय कल्पकतेने या मुखपृष्ठाला आपल्या कुंचल्याने रंगवून साहित्य कलाकृतीच्या वैभवात भर घातली आहे. अतिशय अर्थपूर्ण असलेल्या या मुखपृष्ठावर एका उंच चबुतऱ्यावर काही माणसांच्या प्रतिमा शेतीकाम करणाऱ्या जोडीकडे बघत असल्याचे दिसत आहे.. अतिशय गर्भित अर्थाने या कृतीकडे बघता येईल. सध्या शेती हा असा व्यवसाय आहे की यात राबणारे हात जरी कमी असले तरी खाणारे तोंडे जास्त आहेत. पण जर दोघांनी फक्त प्रामाणिक कष्ट केले तर पूर्ण परिवार सुखाच्या माडीत समाधानाने राहू शकतो, आणि कुटुंबातील जोडीदाराची साथ खंबीर पाहिजे तरच परिवार उंचावर जाऊ शकतो असा अर्थ मला इथे जाणवला आहे

आज ग्रामीण शेतीकडे बघितले तर शेतात जास्त करून महिलाच राबताना दिसतात, आणि अगदी पुरातन काळापासून म्हणजेच सिंधू संस्कृतीपासून आजवर शेतीत महिलांचेच योगदान जास्त राहिले आहे हे नाकारता येणार नाही. बुलढाणा जिल्ह्यातील गुंजखेड, लोणार सारख्या ग्रामीण भागात राहून शेतीमातीच्या कविता निर्मिती करून कवयित्री विद्या सरपाते यांच्या आम्ही रानातली फुले कलाकृतीमुळे शेतीत राबणाऱ्या महिलांना नवचेतना मिळेल, नवी प्रेरणा मिळेल यात शंकाच नाही. कवयित्री विद्या सरपाते यांना पुढील कलाकृती निर्मितीसाठी हार्दिक शुभेच्छा ..!



–मुखपृष्ठ परिक्षण–
प्रशांत एस. वाघ
संपर्क :
७७७३९२५०००

# १५ वर्षात लोकसभा निवडणूक लढविणारे पक्ष दुपटीने वाढले

नवी दिल्ली : २००९ ते २०२४ या दीड दशकामध्ये लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या राजकीय पक्षांची संख्या जवळपास दुपटीने वाढली आहे. २००९ मध्ये निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेल्या पक्षांची संख्या ३६८ एवढी होती. तर, यंदा हाच आकडा ७५१ म्हणजेच १०४ टक्के झाल्याचे बुधवारी समोर आले आहे. याच वेळी २००९ ते २०२४ या काळात लोकसभा निवडणुकीत नशीब आजमावणाऱ्या महिला उमेदवारांची संख्या ७ वरून ९.६ टक्के झाली. यात जवळपास अडीच टक्क्यांची वृद्धी झाल्याचेही समोर आले आहे. निवडणूक अधिकार संबंधित संघटना 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स'ने (एडीआर) लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या ८,३३७ उमेदवारांच्या अर्जांचे विश्लेषण केले. त्यानुसार, २००९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात ३६८ पक्ष उतरले होते. त्यानंतर २०१४ मध्ये हाच आकडा ४६४ झाला. पुढे २०१९ मध्ये ७६६ आणि यंदाच्या निवडणुकीत तब्बल ७५१ राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार उभे केले आहेत. या आकडेवारीवरून २००९ ते २०२४ या १५ वर्षांत निवडणूक लढवणाऱ्या राजकीय पक्षांची संख्या १०४ टक्के म्हणजेच जवळपास दुपटीने वाढल्याचे स्पष्ट झाले, असे एडीआरने सांगितले. यंदाची लोकसभा निवडणूक लढणाऱ्या ८,३६० पैकी १,३३३ उमेदवार राष्ट्रीय पक्षांचे आहेत. तर, ५३२ उमेदवार हे प्रादेशिक पक्ष आणि ३,९१५ अपक्ष उमेदवार रिंगणात आहेत. राष्ट्रीय पक्षांच्या १,३३३ पैकी ४४३ उमेदवार हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. तर, २९५ उमेदवार गंभीर गुन्हेगारी प्रकरणांत आरोपी आहेत. तर यंदाच्या निवडणुकीत २,५७२ उमेदवार कोट्यधीश आहेत, असे एडीआरने सांगितले.

# खतांमध्ये लिंकिंग केल्यास तत्काळ कारवाई करा, जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

## शेतकऱ्यांची फसवणूक खपवून घेणार नाही, यंत्रणेला दिली तंबी

अमरावती : खरीप हंगामाला आता सुरुवात होणार आहे. कृषी निविष्ठांमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास मुलाहिजा केला जाणार आहे. यासोबतच बियाणे व रासायनिक खतांमध्ये लिंकिंगचा प्रकार कुठेही आढळल्यास कृषी विभागाने तत्काळ कारवाई करून एफआयआर दाखल करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले. कपाशीच्या विशिष्ट वाणाचा मागणीच्या तुलनेत कमी पुरवठा झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्याच वाणाच्या बियाण्यांचा आग्रह न धरता, अन्य कंपन्यांचे गुणवत्तापूर्वक बियाणे बाजारात उपलब्ध आहे. त्याचाही वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. खरीप हंगामासाठी जिल्ह्यात मुबलक प्रमाणात बियाणे व रासायनिक खते उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कटियार म्हणाले. बियाणे व रासायनिक खतांमध्ये लिंकिंग करण्याचा प्रकार जिल्ह्यात होता कामा नये, शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम हा महत्वपूर्ण आहे. कृषी निविष्ठांमध्ये लिंकिंग करण्याचा प्रकार आढळल्यास तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश कृषी विभागाला दिल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहूल सातपूते यांना सूचना केल्या असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली

### पीक कर्ज वाटपाचा घेणार आढावा



सध्या मतमोजणीच्या प्रक्रियेची कामे सुरु आहेत. लगेच आपण पीक कर्जवाटपाचा बँकनिहाय आढावा घेणार आहोत. यामध्ये पीक कर्ज वाटपात ज्या बँका माघारल्या, त्यांनी खरीप हंगामात लक्ष्यांक साध्य करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना पीक कर्जवाटप करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

# अर्जुननगर चौकात १५.४२ किलो गांजासह दोघे अटक

अमरावती : विक्रीसाठी गांजा घेऊन आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या युनिट दोनने २८ मे रोजी रात्री अर्जुननगर चौकातून अटक केली. त्यांच्याकडून १५.४२५ किलो गांजासह दोन मोबाइल व रोख असा एकूण ३ लाख २८ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जाकीर खान वल्द रहेमत खान (४०, रा. ताजनगर क्रमांक २) व छत्रपती कचरूजी बांबोर्डे (६०, रा. लुंबिनीनगर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.मंगळवारी रात्री दोघेजण रहाटगावकडून अमरावतीकडे येणाऱ्या रस्त्याने गांजा घेऊन येत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मिळाली. या माहितीच्या आधारावर पथकाने अर्जुननगर चौकात सापळा रचून जाकीर खान व छत्रपती बांबोर्डे यांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळील बॅगची पाहणी केल्यावर त्यात १५.४२५ किलो गांजा आढळून आला. त्यानुसारदोघांनाही अटक करून त्यांच्याकडून गांजा, दोन मोबाइल व ८ हजार ५० रुपये असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपींविरुद्ध गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेडडी, उपायुक्त सागर पाटील, गणेश शिंदे, कल्पना बारवकर व सहायक पोलिस आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात व गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलिस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक महेशकुमार इंगोले, सत्यवान भुयारकर व योगेश इंगळे, पोलिस उपनिरीक्षक संजय वानखडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र काळे, जावेद अहमद, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, सुधीर गुडधे, अजय मिश्रा, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, चंद्रशेखर रामटेके, चेतन कराडे, योगेश पवार, नीलेश वंजारी, सागर ठाकरे, राजीक रायलीवाले, अनिकेत वानखडे, संदीप खंडारे यांनी केली

# एमपीएससी अन् यूपीएससीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार

अमरावती : एमपीएससी, यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून अमरावतीचा नावलौकिक करणाऱ्या विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार २४ मे रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आला. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना कठीण परिश्रम महत्त्वाचे आहेत. तसेच यश मिळाल्यानंतर शासकीय जबाबदारी पार पाडून समाजातील दुःखी लोकांचे अश्रू पुसण्याचे काम करावे. या सोहळ्यातून उपस्थित विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन अधिकारी होण्याचा संकल्प करण्याचे आवाहन यावेळी जीएसटी दिल्लीचे अपर आयुक्त डॉ. प्रशांत रोकडे यांनी मार्गदर्शनातून केले.बौद्ध उपासक संघातर्फे यूपीएससी व एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा भव्य नागरी सत्कार व एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या सत्कार सोहळ्याचे उद्घाटन आ. बळवंत वानखडे यांच्या हस्ते झाले तर अध्यक्षस्थानी मिशन आयएएस अकॅडमीचे संचालक डॉ. नरेशचंद्र काठोळे होते.



विशेष निमंत्रित म्हणून दिल्ली जीएसटीचे अपर आयुक्त डॉ. प्रशांत रोकडे, अतिथी म्हणून आर्या प्रजापती, आर्या संबोधी, समाजभूषण रामेश्वर अभ्यंकर, उद्योजक गुणवंत देवपारे, डॉ. प्रदीप दंदे, भूषण बनसोड, जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे, माजी नगरसेवक तथा सभापती मंगेश मनोहरे उपस्थित होते.

यावेळी यूपीएससी उत्तीर्ण केलेल्या पल्लवी चिंचखेडे, ऋषिकेश ठाकरे, क्षितिज गुरभेले, तर एमपीएससी उत्तीर्ण निपुण मनोहर यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेचे करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आर्या प्रजापती, आर्या संबोधी यांनी उपस्थितांना त्रिशरण, पंचशील दिले. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीविषयी यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित मान्यवरांनीही मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येनी युवक व नागरिक उपस्थित होते

# खाटीक समाज परिवर्तन संघटनेतर्फे सामूहिक विवाह सोहळा

अमरावती : खाटीक समाज परिवर्तन संघटनेच्या वतीने शनिवार, १८ मे रोजी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.संघटनेचे अध्यक्ष नंदकिशोर हरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या विवाह सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून कृणाल कंटाळे यांची उपस्थिती होती. यावेळी समाजातील गुणवंत तरुणांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात विवाहबद्ध झालेल्या जोडप्यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू प्रदान करण्यात आला.




भविष्यात खाटीक समाज परिवर्तन संघटनेच्या वतीने वर-वधू परिचय मेळावा, दसरा मेळावा आयोजित करण्याचा आणि तालुक्यात व गावागावांत शाखा स्थापन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. विवाह सोहळ्याचा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे अध्यक्ष नंदकिशोर हरणे, कार्याध्यक्ष विठ्ठलराव कठाळे, सचिव मोहन नेहर, कोषाध्यक्ष रामेश्वर माहुरकर, सल्लागार माणिकराव नेहर, विजयराव हरणे, राजकुमार दुर्गे, गजानन कंटाळे, प्रमोद हरणे, सुभाषराव लोणारे, प्रमोद हरणे, डॉ. श्रीकृष्ण कंटाळे, महेंद्र विल्हेकर, सुरेश माहुरे, सतीश माहुरे, सुधाकर कंटाळे, अंबादास कंटाळे, जितेंद्र घनघोरकर, पवन सदाफळे, उमेश डोईफोडे, मनोहर पारवे, प्रवीण माहुरे, शालीकराम कंटाळे, भास्कर माहुरकर, संजयराव कुडेकर, प्रेमलता चौधरी, गणेश माहुरकर, मधुकर कंटाळे, मनोहर माहुरकर, अरुण धर्माळे, दीपक घनाडे, श्रीकृष्ण लोणारे, शंकर मांडवे, प्रकाश खंडारे, मारोतराव रावेकर, राजू लोणारे, तृषाल कंटाळे, अशोक दुर्गे, जयदेव गोळे, प्रा. ताराचंद कंटाळे, सुरेश कंटाळे, आहुल माहुरे, रमेश लोणारे, विजय घनाडे, हिंमतराव डोईफोडे, राजेंद्र माहुरे, श्रीकांत विल्हेकर, पंकज रावेकर, गोपाळ पारडे, दादाराव गायगोले, चंद्रभान पारडे आदींचे सहकार्य लाभले.

# ग्राहकांच्या घरी जबरदस्ती प्रीपेड मीटर लावू नका

## ग्राहक मंचाने दिले महावितरणला निवेदन

चांदूर रेल्वे : सध्या शहरात प्रत्येक घरामध्ये महावितरण विभागाचे डिजिटल वीज मीटर लागले आहेत. असे असतानासुद्धा महावितरण विभागाकडून सक्तीने प्रत्येक घरामध्ये प्रीपेड मीटर बसविण्याचे सत्र चालू होणार आहे. ग्राहक मंचाद्वारे प्रीपेड मीटर न बसवण्याच्या संदर्भात महावितरणला निवेदन देण्यात आले.



वीज कायदा २०२३ कलम ५५ नुसार प्रत्येक ग्राहकांना वीज मीटर निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. वीज मीटर बसविण्याबाबत महावितरण विभागाने अघोषित सक्तीचे वातावरण निर्माण केले आहे. डिजिटल वीज मीटर बसविण्यापूर्वी वीज बिल कमी येत होते. पण डिजिटल मीटर लागल्यानंतर वीज बिलामध्ये वाढ झालेली आहे. आता प्रीपेड, पोस्टपेड, स्मार्ट वीज मीटर बसविल्यानंतर वीज बिलामध्ये पुन्हा भरमसाठ वाढ होण्याची शक्यता आहे. ग्राहक महागडी वीज खरेदी करू शकणार नाही. त्यामुळे प्रीपेड मीटर सक्तीचे झाल्यास आंदोलनाचा उद्रेक होऊ शकतो, असा इशारा ग्राहक मंचने दिला आहे. यावेळी निवेदन देताना हरिहर मसदकर, अजय होटे, शशिकांत गाडेकर, लक्ष्मण दरेकर, प्रभाकर भगोले, मंगेश बोबडे उपस्थित होते.

# 'मुंज्या'मध्ये तरस गाण्यावर शर्वरी वाघ चा जबरदस्त परफॉर्मन्स



*अभिनेत्री शर्वरी वाघ आपला आगामी चित्रपट 'मुंज्या' मुळे चर्चेत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर रीलीज करण्यात आला आहे. हे पाहून प्रेक्षकांचा उत्साह आणखी वाढला आहे. कारण या चित्रपटाच्या कथेमध्ये नवं काही तरी पाहायला मिळणार आहे. शर्वरीचे गाणे 'तरस' इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहे. शर्वरी वाघचा जन्म १४ जून, १९९७ रोजी मुंबईत झाला. तिचे शालेय शिक्षण दादर पारसी युथ असेंब्ली हायस्कूलमध्ये झाले. मुंबईतील रुपारेल कॉलेजमध्ये शिकलेली शर्वरी राजकीय कुटुंबातील आहे. शर्वरीने १६ व्या वर्षी मॉडेलिंग करणे सुरु केले. तिने अनेक जाहिरातींमध्ये काम केले आहे. या गाण्यात अभिनेत्री शर्वरीचा बोल्ड अंदाज पाहायला मिळत आहे. हे गाणे आतापर्यंत १ कोटी २० लाखांहून अधिक वेळा यूट्यूबवर पाहण्यात आले आहे. मुंज्या चित्रपट ७ जूनला रिलीज होणार आहे. या गाण्याबद्दल शर्वरी म्हणते, मला जेव्हापासून हिंदी चित्रपटामध्ये अभिनेत्री व्हायचं होतं. एक मोठे डान्स नंबर करण्याची माझी नेहमीच इच्छा होती. अशी गाणी नेहमीच मला मोहित करतात. 'भूल भुलैया ३' च्या सेटवरून फोटो आले समोर; माधुरी, तृप्ती, विद्या बालन हॉट अभिनेत्री एकत्रित.मुंज्याचे दिग्दर्शन आदित्य सरपोतदार यांनी केलं आहे. निर्मिती दिनेश विजानआणि अमर कौशिक यांची आहे.*

# अजित पवारांचं आव्हान स्वीकारते, पण एक अट : अंजली दमानिया



मुंबई : पुण्यातल्या अल्पवयीन गर्भश्रीमंत मुलाने वडिलांच्या आलिशान पोर्श कारने अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा या दोन तरुणांना (दुचाकीवरून प्रवास करत असताना) धडक दिली होती. त्या धडकेत या दोघांचा मृत्यू झाला. दरम्यान, आरोपीला वाचवण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर अनेक प्रयत्न झाले. आरोपीच्या अटकेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाचे आमदार सुनील टिंगरे पोलीस ठाण्यात दाखल झाले होते. अटकेनंतर अवघ्या काही तासांतच ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याची शिक्षा देऊन आरोपीचा जामीन मंजूर झाला. आरोपी मध्यधुंद अवस्थेत कार चालवत असल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले होते, मात्र त्याने मद्य प्राशन केलं नव्हतं असं सिद्ध करण्यासाठी ससून रुग्णालयात त्याच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये फेरफार झाल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. याप्रकरणी ससून रुग्णालयाच्या फॉरेन्सिक विभागातील दोन डॉक्टर अटेकत आहेत. दरम्यान, हे दोन्ही डॉक्टर अजित पवारांच्या राष्ट्रवादीमधील नेते आणि वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफांच्या आशीर्वादामुळे 'ससून'मध्ये असल्याचा आरोप काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला. पाठोपाठ उपमुख्यमंत्री अजित पवारांवरही आरोप होऊ लागले. तसेच ते या विषयावर काहीच बोलत नसल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

दरम्यान, आरोपीच्या वडिलांचे आणि अजित पवारांचे हितसंबंध असून त्यांच्यात आतापर्यंत अनेक राजकीय व्यवहार झाल्याचे आरोप होत आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, शरद पवार गटातील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांवर वेगवेगळे आरोप केले आहेत. या अपघात प्रकरणावर बोलताना अंजली दमानिया यांनी अजित पवारांवर गंभीर आरोप केले होते. याप्रकरणी अजित पवारांची नार्को टेस्ट करावी, अशी मागणीही दमानिया यांनी केली होती. दमानिया म्हणाल्या, या अपघात प्रकरणानंतर अजित पवारांनी पुण्याच्या पोलीस आयुक्तांना अनेक फोन केले होते. मी हे अनेक पत्रकारांच्या समाज माध्यमांवरील पोस्ट आणि प्रसारमाध्यमांवरील बातम्यांच्या आधारे बोलत आहे.

# पंतप्रधानांच्या कन्याकुमारी दौऱ्याविरोधात काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे तक्रार

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा प्रचार संपताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कन्याकुमारीतील प्रस्तावित ध्यानधारणा दौऱ्याविरुद्ध काँग्रेसने बुधवारी (दि.२९) केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे.

काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, सरचिटणीस रणदीप सुरजेवाला व नासीर हुसैन यांनी निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन पंतप्रधानांच्या दौऱ्याविषयी तक्रार दाखल केली. या तक्रारीबाबत माहिती देताना सिंघवी म्हणाले की, निवडणूक प्रचारास ४८ तासांची



बंदी असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी कन्याकुमारीला जात आहेत. त्यांच्या ध्यानधारणेमुळे आचारसंहितेचे उल्लंघन होणार आहे. त्यामुळे पंतप्रधानांना हा दौरा रोखावा, अशी मागणी काँग्रेसने आयोगाकडे केली आहे.

**मोदी ३० मे ते १ जूनदरम्यान कन्याकुमारीला जाणार**

लोकसभा निवडणूकीच्या अंतिम टप्प्याचा प्रचार संपताच पंतप्रधान नरेंद्र मोदी ध्यानधारणेसाठी कन्याकुमारीला जाणार आहेत. गेल्या दीड महिन्यापासून लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर सभा, रोड शोच्या माध्यमातून मोदींचा जोरदार प्रचार सुरु आहे. प्रचाराचा हा क्षीण भागविण्यासाठी मोदी हे ३० मे ते १ जूनदरम्यान ध्यानधारणा करण्याच्या उद्देशाने कन्याकुमारीला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या दौऱ्यात पंतप्रधान मोदी हे रॉक मेमोरियलला भेट देतील. स्वामी विवेकानंद यांनी ध्यानधारणा केलेल्या पावनस्थळावर मोदी ध्यानधारणा करणार आहेत. हा दौरा आध्यात्मिक असून त्यात कुठलेही राजकीय कार्यक्रम होणार नसल्याचे सूत्रांनी सांगितले. मोदी यापूर्वी २०१९ च्या निवडणुकीनंतर केदारनाथला गेले होते. २०१४ मध्ये ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या प्रतापगडला गेले होते. दुसरीकडे, काँग्रेस नेते राहुल गांधीही लोकसभा प्रचार संपल्यावर विपश्यना करण्यासाठी दौऱ्यावर जाण्याची शक्यता आहे.

# उष्णतेचा आगडोंब, दिल्ली ५१.४ अंश सेल्सिअस; रेकॉर्ड ब्रेक तापमानाची नोंद

नवी दिल्ली : दिल्लीच्या मुंगेशपूर हवामान केंद्रात ५१.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. शहराच्या इतिहासातील आतापर्यंतचे ही सर्वोच्च तापमान नोंद आहे, असे वृत्त 'एएनआय'ने दिले आहे.

**मान्सून केरळमध्ये दाखल होण्यास परिस्थिती अनुकूल**

वायव्य आणि मध्य भारतातील प्रचलित उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट ३० मे २०२४ पासून हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे.

पुढे केरळमध्ये नैऋत्य मोसमी पाऊस सुरू होण्यासाठी आणि पुढील ३-४ दिवसांत ईशान्येकडील राज्यांच्या काही भागांत पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचे देखील हवामान विभागाने म्हटले आहे.



उत्तर भारतातील उष्णतेच्या लाटेबाबत, वरिष्ठ खचू शास्त्रज्ञ डॉ. नरेश कुमार म्हणतात, राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली-एनसीआर, पश्चिम उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात पुढील दोन दिवस उष्णतेची लाट राहील. त्यानंतर, उष्णतेची लाट थोडी कमी होईल. अरबी समुद्रातून येणाऱ्या वाऱ्यांमुळे तापमानात घट होणार आहे आणि येत्या ३-४ दिवसांत केरळमध्ये उष्णतेची लाट कमी होण्याची शक्यता आहे.

# भारताच्या प्रज्ञानंदने ग्रॅंडमास्टर मॅग्नस कार्लसनला चारली धूळ



नवी दिल्ली : भारताचा युवा ग्रॅंडमास्टर आर प्रज्ञानंदने (ठ झऑरससपरपरपवहरर) बुद्धिबळ क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. प्रज्ञानंदने बुधवारी (दि.२९) स्टॅव्हेंगर येथे नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या मॅग्नस कार्लसनवर (चरसपींी उरऑश्रीशप) पहिला क्लासिकल विजय नोंदवला. भारतीय ग्रॅंडमास्टरने खुल्या विभागात एकमेव आघाडी घेतली आहे.

या विजयासह १८ वर्षीय आर. प्रज्ञानंदने कार्लसनच्या घरच्या मैदानावर झालेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आघाडीचे स्थान प्राप्त केले आहे. बुधवारी 'नॉर्वे बुद्धिबळ २०२४' स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत विश्वातील अव्वल बुद्धिबळपटू मॅग्सन कार्लसनवर मात केली. त्याने तिसऱ्या फेरीच्या शेवटी ९ पैकी ५.५ गुण मिळवले. दुसरीकडे, अमेरिकन ग्रॅंडमास्टर फॅबियो कारुआनाने बुधवारी जीएम डिंग लिरेनवर विजय मिळवून तीन गुणांसह दुसरे स्थान मिळवले.

प्रज्ञानंदनेचे हे मोठे यश आहे. गेल्या वर्षीच्या विश्वचषकात तो मॅग्नस कार्लसनकडून पराभूत झाला होता.

क्लासिकल बुद्धिबळात कार्लसनला पराभूत करणारा प्रज्ञानंद हा केवळ चौथा भारतीय आहे. दुसरीकडे, प्रज्ञानंदची बहीण आर वैशाली हिने नॉर्वे बुद्धिबळाच्या महिला गटात आपले अव्वल स्थान कायम राखले आहे.

# महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध पीकनिहाय वाणासाठी अर्ज करण्याचे आवाहन

अमरावती : खरीप हंगाम २०२४ साठी राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीतधान्य अंतर्गत सोयाबीन पीक प्रात्यक्षिके तसेच प्रमाणित बियाणे वितरण व राष्ट्रीय अन्न पोषण सुरक्षा अभियान कडधान्यच्या माध्यमातून तूर, मूग, उडीद पीक प्रात्यक्षिके तसेच प्रमाणित बियाणे वितरण ह्या बाबी राबविण्यात येत आहेत. या बाबींच्या लाभासाठी लाभाथ्यर्थ्यांने महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे, लाभार्थ्यांने अर्ज करत असताना जिल्ह्यासाठी उपलब्ध असलेल्या वाणाकरिताच अर्ज करणे आवश्यक आहे.

सोयाबीन पीकासाठी पीडीकेव्ही अंबा, सुवर्ण सोया, फुले संगम, एनआरसी-१३०, जेएस-२०३४, एमऐयुएस-६१२, जेएस-२९-११६ फुले किमया, फुले दुर्वा वाण उपलब्ध आहे. तूर पिकासाठी बीडीएन-७१६, जीआरजी-१५२ (भीमा), तर १० वर्षांवरील वाण आशा, मारोती, पीकेव्ही तारा, फुले राजेश्वरी उपलब्ध आहे. मूग पीकासाठी उत्कर्षा हे वाण तर दहा वर्षावरील वाण बीएम-२००३-२ पीके व्ही-एकेएम-४ उपलब्ध आहे. तसेच उडीद पीकासाठी एकेयु-१०-१ वाण उपलब्ध आहे. सदर प्रमाणे उपलब्ध असलेल्या सोयाबीन वाणाच्या बियाण्यास पीक प्रात्यक्षिकांतर्गत रुपये ४ हजार प्रतिक्विंटल व प्रमाणित बियाणे वितरण या बाबींतर्गत रुपये २ हजार प्रतिक्विंटल या प्रमाणे अनुदान देय आहे. तसेच प्रमाणित बियाणे वितरण या बाबींतर्गत तूर, मूग व उडीद बियाण्यांच्या १० वर्षांआतील वाणास रुपये ५ हजार प्रतिक्विंटल व १० वर्षांवरील वाणास रुपये २ हजार ५०० प्रतिक्विंटल याप्रमाणे अनुदान देय आहे.

पीक प्रात्यक्षिकां तर्गत तूर, मूग व उडीद १० वर्षांआतील वाणाच्या बियाण्यास १०० टक्के अनुदान देय राहील. अधिक माहितीसाठी आपल्या गावातील कृषी साहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा व पीकनिहाय वाणासाठी अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहल सातपते यांनी केले आहे

# टी-२०त भारत अव्वल

दुबई: टी-२० विश्वचषकस्पर्धेच्या आधी जाहीर झालेल्या जागतिक टी-२० क्रमवारीत भारताने २६४ गुणांसह अव्वल स्थान कायम राखले आहे. दोन वेळचा विश्वचषक विजेता वेस्ट इंडीज संघाने टी-२० विश्वचषकापूर्वी दक्षिण आफ्रिकेवर ३-० विजय मिळवल्याने चौथ्या स्थानी झेप घेतली आहे. २०१२ आणि २०१६ विश्वविजेता वेस्ट इंडीजचा संघ न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेच्या पुढे आहे.


## आपली अमरावती, आपली दुग्धपुर्णा

१८५३ साली वऱ्हाड निजामाकडून इंग्रजांकडे आले. त्यांनी काही महत्वाच्या सुधारणा केल्या. त्यापैकी सर्वात महत्वाची म्हणजे शिक्षणाची सोय. १८५३ पूर्वी वऱ्हाडात एकही सरकारी शाळा नव्हती. जे काही शिक्षण मिळायचे ते खाजगी शिक्षकांकडून अथवा पाठशाळेमधूनच मिळत असे. १८६६ मध्ये वऱ्हाडात शिक्षण खात्याची स्थापना झाली. डॉक्टर सिक्लेअर हे शिक्षण खात्याचे पहिले डायरेक्टर, १८६६ मध्ये अमरावतीला हायस्कूलची सुरूवात झाली. त्या अगोदर १८५३ च्या सुमारास अमरावतीला सरकारी प्रायमरी शाळा सुरू झाली होती. ती म्हणजे भाजी बाजारातील क्रमांक एकची प्रायमरी शाळा. आज ही ती तेथेच आहे. हा जुना हैद्राबादच्या नबाबाचा अमरावती मधील वाडा होता.

मे.दुग्धपूर्णा शितालय

राजकमल चौक, अमरावती. फोन : २५६२६६२












गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com. (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)